# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

## <u>जाहिरात</u>

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील अभियांत्रिकी विभागाच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यात नमूद केलेली रिक्त तसेच संभाव्य रिक्त पदे भरावयाची आहेत. त्यासाठीची निवड यादी बनविण्याकरिता खाली नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून online अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी स्वतः खात्री करावयाची आहे की ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता व अटींची पूर्तता करत असून पात्र आहेत. उमेदवारांनी http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवरून ऑन लाईन अर्ज करावेत. अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा (valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे आणि भरती प्रक्रिया परिक्षेचे प्रवेशपत्र आणि इतर माहिती online देण्यात येणार असल्याकारणाने भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहाणे आवश्यक आहे.

**I महत्वाची माहिती -**

ऑन-लाईन परिक्षा : दि. 9 आणि/अथवा 10 फेब्रुवारी 2013

ऑन-लाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी : 4 जानेवारी ते 20 जानेवारी 2013

नेट बॅंकिंगद्वारे अर्ज शुल्क जमा करण्याचा कालावधी : 6 जानेवारी ते 20 जानेवारी 2013

(वरील दिनांकात बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहातील.)

**II रिक्त आणि संभाव्य रिक्त पदांचा तपशिल -**

| **पदाचे नाव - 1. दुय्यम अभियंता (स्थापत्य)** | | **अनुशेषांतर्गत पदे** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | खुला प्रवर्ग | एकुण रिक्त पदे |
| **पदे** | | 38 | 37 | 10 | 8 | 13 | 8 | 63 | 8 | 85 | 270 |
| **<u>समांतर आरक्षण :</u>** | | | | | | | | | | | |
| अ | महिला (30%) | 11 | 11 | 3 | 2 | 4 | 2 | 19 | 2 | 25 | 79 |
| ब | खेळाडू ( 5%) | 2 | 2 | 1 | 0 | 1 | 0 | 3 | 0 | 4 | 13 |
| क | सर्वसाधारण | 25 | 24 | 6 | 6 | 8 | 6 | 41 | 6 | 56 | 178 |
| **पदाचे नाव - 2. दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत)** | | **अनुशेषांतर्गत पदे** | | | | | | | | | |
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | खुला प्रवर्ग | एकुण रिक्त पदे |
| **पदे** | | 11 | 6 | 4 | 2 | 3 | 3 | 21 | 0 | 0 | 50 |
| **<u>समांतर आरक्षण :</u>** | | | | | | | | | | | |
| अ | महिला (30%) | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 6 | 0 | 0 | 15 |
| ब | खेळाडू( 5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 3 |
| क | सर्वसाधारण | 7 | 4 | 3 | 1 | 2 | 2 | 13 | 0 | 0 | 32 |

| पदाचे नाव - 3. दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ ) | | अनुशेषांतर्गत पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | खुला प्रवर्ग | एकुण रिक्त पदे |
| पदे | | 1 | 2 | - | - | - | - | 1 | - | - | 4 |
| समांतर आरक्षण : | | | | | | | | | | | |
| अ | महिला (30%) | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| ब | खेळाडू ( 5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| क | सर्वसाधारण | 1 | 1 | | | | | 1 | | | 3 |

| पदाचे नाव - 4. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | | अनुशेषांतर्गत पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | खुला प्रवर्ग | एकुण रिक्त पदे |
| पदे | | 47 | 21 | 15 | 8 | 9 | 8 | 43 | 11 | 132 | 294 |
| समांतर आरक्षण : | | | | | | | | | | | |
| अ | महिला (30%) | 14 | 6 | 5 | 2 | 3 | 2 | 13 | 3 | 39 | 87 |
| ब | खेळाडू ( 5%) | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 7 | 14 |
| क | सर्वसाधारण | 31 | 14 | 9 | 6 | 6 | 6 | 28 | 7 | 86 | 193 |

| पदाचे नाव - 5. कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) | | अनुशेषांतर्गत पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | खुला प्रवर्ग | एकुण रिक्त पदे |
| पदे | | 8 | 9 | 1 | 0 | 5 | 4 | 0 | 0 | 9 | 36 |
| समांतर आरक्षण : | | | | | | | | | | | |
| अ | महिला (30%) | 2 | 3 | 0 | 0 | 2 | 1 | 0 | 0 | 3 | 11 |
| ब | खेळाडू (5%) | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |
| क | सर्वसाधारण | 6 | 5 | 1 | 0 | 3 | 3 | 0 | 0 | 5 | 23 |

उपरोक्त एकूण रिक्त पदांपैकी अपगांसाठी खालीलप्रमाणे अनुशेष आहे.

| संवर्ग | श्रवण शक्तीतील दोष | चलनवलन विषयक विकलांगता | अपंगांसाठी आरक्षित एकुण पदे |
|---|---|---|---|
| दुय्यम अभियंता (स्थापत्य) | 12 | 5 | 17 |
| दुय्यम अभियंता (यांत्रिकी वविद्युत) | 2 | 0 | 2 |
| दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ ) | सदर संवर्गासाठी एक पद आरक्षित होत असून हे पद उपलब्धतेनुसार भरण्यात येईल. | | 1 |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 7 | 8 | 15 |
| कनिष्ठ अभियंता(यांत्रिकी व विद्युत) | 2 | 0 | 2 |

**टिप :** अपंग उमेदवारांनी सदर पदाची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता/पात्रता याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती वेबसाइटवर प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत पाहून त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे.

**III) समांतर आरक्षण -**

अ) शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी 30% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात येईल. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ब) उपरोक्त II मध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांपैकी शासन निर्णय क्र. राकीधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि. 30.4.2005 अन्वये अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरूष खेळाडूंसाठी 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल. सदर शासन निर्णय जाहिरातीच्या अखेरीस पाहाता येईल.

**IV) वेतनश्रेणी व वेतनश्रेणी नुसार वर्गीकरण :**

1) दुय्यम अभियंता (स्थापत्य), दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) आणि दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ) गट (ब):- रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4600 /- + अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीत मूळ वेतन रु. 12540/-

2) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) आणि कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) गट (ब):- रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4300/- + अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीत मूळ वेतन रु. 9300/-

**V) शैक्षणिक अर्हता -**

**<u>पदनाम - दुय्यम अभियंता (स्थापत्य)</u>**

1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य वा कन्स्ट्रक्शन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा तिच्याशी समकक्ष अर्हता संपादित केली आहे किंवा जे इंस्टिटयुशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी प्राप्त केली आहे.

**किंवा**

2) जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की जे स्थापत्य अभियांत्रिकीमधील परिक्षा देवून त्या संस्थेचे सभासदत्व इंस्टिट्युशन ऑफ सिव्हील इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

**<u>पदनाम - दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत)</u>**

1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/ विद्युत /प्रॉडक्शन / ऑटोमोबाईल /इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मधील पदवी किंवा बॅचलर इन इंजिनिअरिंग (इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड पॉवर इंजिनिअरिंग) किंवा तिच्याशी समकक्ष अर्हता संपादित केली आहे किंवा जे इंस्टिटयुशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची यांत्रिकी / विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या यांत्रिकी/ विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील पदवी प्राप्त केली आहे.

**किंवा**

2) जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की जे यांत्रिकी / विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील परिक्षा देवून त्या संस्थेचे सभासदत्व इंस्टिटयुशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

**<u>पदनाम - दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ)</u>**

1) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची वास्तुशास्त्रातील पदवी प्राप्त केली आहे.

**किंवा**

2) जे रॉयल इंस्टिटयुशन ऑफ ब्रिटिश आर्किटेक्टस या संस्थेचे सहयोगी सभासद आहेत.

**किंवा**

3) ज्यांनी कलाभवन बडोदा या संस्थेची वास्तुशास्त्रातील पदवीका प्राप्त केली आहे.किंवा ज्यांनी महाराष्ट्र सरकारची [पुर्वीचे मुंबई सरकार] तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील शासकीय पदवीका प्राप्त केली आहे.

**किंवा**

4) ज्यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्किटेक्चर मुंबई या संस्थेच्या पाचव्या वर्षाच्या शाळा परीक्षेसह समकक्ष अर्हता प्राप्त केलेल्या आहेत.

**किंवा**

5) ज्यांनी ऑर्किटेक्टस ॲक्ट 1972 च्या कलम 35 [2] [1862 चा क्र. 20] अन्वये कौन्सिल ऑफ आर्किटेक्टस या संस्थेने रजिस्टर ऑफ ऑर्किटेक्टस मध्ये नोंदणीसाठी मान्य केलेल्या समकक्ष अर्हता प्राप्त केलेल्या आहेत.

**<u>पदनाम - कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)</u>**

उमेदवाराने किमान एस. एस. सी. वा समकक्ष परीक्षेनंतर किमान 3 वर्षांची स्थापत्य अभियांत्रिकीमधील वा पब्लिक हेल्थ इंजिनिअरींगमधील पदविका संपादीत केलेली असावी किंवा महाराष्ट्र शासनाने ज्या पदविकेशी समकक्ष ठरविलेली व मुंबई महानगरपालिकेने मान्य केलेली तत्सम पदविका संपादित केलेली असावी किंवा उमेदवार महानगरपालिकेने मान्य केलेली स्थापत्य अभियांत्रिकी मधील उच्च व्यावसायिक अर्हता धारण करणारा असावा.

**<u>पदनाम - कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत)</u>**

उमेदवाराने किमान एस. एस. सी. वा समकक्ष परीक्षेनंतर किमान 3 वर्षांची यांत्रिकी/विद्युत/ऑटोमोबाईल /प्रॉडक्शन इंजिनिअरिंग मधील पदविका किंवा डिप्लोमा-इन-इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम/डिप्लोमा-इन इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स/डिप्लोमा प्रोग्राम इन इन्स्ट्रुमेंटेशन/डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग संपादित केलेली असावी किंवा इन्स्टिट्युशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची टेक्निशिअन इंजिनिअरींग एक्झामिनेशन उत्तीर्ण झालेला असावा किंवा महाराष्ट्र शासनाने या पदविकेशी समकक्ष ठरविलेली व मुंबई महानगरपालिकेने मान्य केलेली तत्सम पदविका संपादित केलेली असावी किंवा उमेदवार महानगरपालिकेने मान्य केलेली उच्च व्यावसायिक अर्हता धारण करणारा असावा.

टीपः 1) दुय्यम अभियंता आणि कनिष्ठ अभियंता या दोन्ही संवर्गात इलेक्ट्रॉनिक्स पदवी/पदविका धारकांसाठी सध्या रिक्त पद उपलब्ध नाही.

2) मान्यताप्राप्त संस्थाविषयी माहिती पुढील संकेतस्थळावर पाहाता येईल www.aicte-india.org; www.dte.org.in

**उपरोक्त सर्व पदांसाठी:**

i) उमेदवार डी. ओ. ई. ए. सी. सी. सोसायटीचे सी. सी. सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर या स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम. एस. सी. आय. टी. किंवा जी. ई. सी. टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने

विहित केलेली एम. एस. सी. आय. टी.ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

ii) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर वा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**VI) टक्केवारीची किमान मर्यादा -**

| 1. | अर्हकारी परीक्षा | प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | **दुय्यम अभियंता (स्थापत्य), दुय्यम अभियंता (यां व वि.), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) आणि कनिष्ठ अभियंता (यां व वि.)** | | |
| | एस. एस. सी. | सर्व प्रवर्गासाठी | 50% |
| | एच. एस. सी. (केवळ दुय्यम अभियंता पदांसाठी) | सर्व प्रवर्गासाठी | 50% |
| | पदवि/पदविका परीक्षा | खुला | 60% |
| | | अनु.जाती, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इ.मा.व., वि.मा.प्र. | 55% |
| | | अनुसूचित जमाती | 50% |
| 2 | **दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ)** | | |
| | एस. एस. सी., एच. एस. सी., पदवी किंवा तत्सम | खुला | 60% |
| | | अनु.जाती, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इ.मा.व., वि.मा.प्र. | 55% |
| | | अनुसूचित जमाती | 45% |

**VII) वयोमर्यादा -** उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत नसल्यास त्याचे वय दि. 01.01.2013 रोजी

अ) खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 33 वर्षे दरम्यान,

ब) मागास प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षे दरम्यान,

क) शासन निर्देशानुसार अपंगांसाठी 18 ते जास्तीत जास्त 45 वर्षे आणि

ड) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असल्यास उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा नाही.

**VIII) निवडीचे निकष -**

(i) सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेल्या अर्हता/अटी/शर्ती पूर्ण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची ऑन-लाइन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून विहीत आरक्षणानुसार निवड यादी बनविण्यात येईल.

(ii) दुय्यम अभियंता आणि कनिष्ठ अभियंता या पदासाठी पात्र होण्याकरीता उमेदवारास ऑनलाइन परीक्षेत किमान 50% गुण मिळणे आवश्यक आहे.

(iii) दोन किंवा अधिक उमेदवारांचे गुण समान झाल्यास उमेदवारांच्या प्राधान्य क्रमाकरिता खाली दिलेले निकष क्रमवारीनुसार विचारात घेण्यात येतील.

अ) अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेली उच्च शैक्षणिक अर्हता,

ब) उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक,

क) उमेदवारांच्या प्राधान्य क्रमाकरीता त्यांचे प्रथम पदवी व नंतर पदविका परिक्षेत प्राप्त गुण विचारात घेण्यात येतील,

ड) वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास , वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल,

- उपरोक्त सर्व पदांसाठी वेगवेगळी परीक्षा घेण्यात येईल. तथापी उमेदवार कोणत्याही एका पदासाठीचीच परीक्षा देऊ शकेल.
- उपरोक्त निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना राहतील.

**ऑन-लाईन परिक्षेमध्ये खालील वस्तुनिष्ठ प्रश्न-पद्धतीचा अंतर्भाव असेल:**

| अ. क्र. | चाचणी | प्रश्नांची संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य ज्ञान | 20 | 20 | 1 तास |
| 2 | बौद्धिक क्षमता | 50 | 50 | |
| 3 | तांत्रिक ज्ञान | 30 | 30 | |

- प्रत्येक चूक उत्तरादाखल सदर प्रश्नासाठी असलेल्या गुणांच्या ¼ गुण वजा करण्यात येतील.

**IX) ऑन-लाईन अर्ज सादर करण्याची पद्धत -**

1. सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या 23.59 वाजेपर्यंत http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवर अर्ज सादर करावेत. इतर कोणत्याही पद्धतीने पाठविलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत. उमेदवाराने अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी काळजीपूर्वक भरावा. उमेदवारांचे अर्ज ऑन-लाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑन-लाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑन-लाईन पद्धतीने अर्ज करताना काही त्रुटी राहिल्यास संगणक अर्ज स्विकारणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

2. उमेदवारांकडे वैयक्तीक ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे आणि सदर ई-मेल आयडी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू असणे आवश्यक आहे. उमेदवाराने स्वतः खात्री करावयाची आहे की सदर ई-मेल आयडी कोणाबरोबरही विभागून वापरण्यात येत नाही किंवा त्याची दुस-यास माहिती देण्यात येत नाही किंवा दुस-या कोणाच्या ई-मेल आयडीचा उमेदवार वापर करीत नाही.

3. उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करताना ऑन-लाईन जाहिरातीत नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराचा अर्ज सादर होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच उमेदवांराने 2.5cm X 5.00cm यापेक्षा जास्त नाही एवढ्या आकाराची स्वत:ची काळ्या शाईने केलेली सही अपलोड करणे आवश्यक आहे.

4. उमेदवाराने सदर पदाच्या अर्हता/अटींनुसार तो सदर पदासाठी पात्र असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

5. उमेदवार खाली नमूद केलेले परीक्षा शुल्क Net Banking पद्धतीने क्रेडीट कार्ड किंवा डेबिट कार्ड वापरून भरू शकतील.

   खुल्या प्रवर्गातील उमेदवार : रु. 400/-

   मागास/इतर मागासप्रवर्गातील उमेदवार : रु. 200/-

6. विहित नमुन्यातील ऑन-लाईन अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि. 4 जानेवारी 2013 पासून दि. 20 जानेवारी 2013 च्या 23:59 वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

7. अर्ज सादर केल्यानंतर उमेदवारास नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड मिळेल. उमेदवाराने त्याची नोंद घेऊन पुढील वापरासाठी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. उमेदवारास नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड एस. एम. एस. द्वारे त्याच्या भ्रमणध्वनीवर आणि ई-मेलद्वारे त्याच्या ई-मेल आयडीवर कळविण्यात येईल.

a) अर्ज काळजीपूर्वक भरावा. उमेदवार एका दमात ऑन-लाइन अर्ज न भरू शकल्यास त्याने सदर अर्ज भरलेल्या माहितीसह सेव्ह करावा. माहिती सेव्ह होताच नोंदणी क्रमांक व पासवर्डची आपसुक निर्मिती होवून तो समोरील पडद्यावर दिसेल. अर्जदाराने त्याची योग्यती नोंद घ्यावी. नोंदणी क्रमांक व पासवर्ड अर्जदारास एसएमएसने व ई-मेलने कळविण्यात येईल. अर्जदाराने सेव्ह केलेली माहिती नोंदणी क्रमांक व पासवर्डचा वापर करून आवश्यकतेनुसार पुन्हा उघडता येईल व नव्याने तपशीलाचे संकलन करता येईल. ही सुविधा केवळ तीन वेळाच वापरता येईल. संपूर्ण माहिती भरून झाल्यावर उमेदवाराने अर्ज सादर (submit) करावा. उमेदवाराने शुल्क भरून निर्माण झालेल्या पावतीची प्रत त्वरीत मुद्रण करून (printout) घ्यावी. ह्या पायरीनंतर अर्जात कोणताही बदल होणार नाही तसेच येथपर्यंत अर्जाची नोंदणी कामचलाऊ (provisional) आहे.

b) आपण अर्जात माहिती बिनचूक भरल्याची उमेदवाराने खात्री केल्यावर समोरील पडद्यावर दिलेल्या सुचनांनुसार उमेदवाराने, अर्जासोबतच जोडून असलेल्या पेमेण्ट गेटवेद्वारे शुल्क भरावे. ह्या पायरीनंतर कोणतागही बदल करता येणार नाही.

c) समोरील पडद्यावर दिलेल्या सुचनांनुसार उमेदवार पुढील पैकी एका मार्गाने शुल्क भरू शकतो. मास्टर/व्हिसा डेबिट/क्रेडिट कार्ड किंवा इंटरनेट बँकिंग. ऑन-लाइन शुल्क अदा करण्यासाठी येणारे व्यवहार शुल्क अर्जदारानेच भरावयाचे आहे.

d) सदर व्यवहार यशस्विरित्या पूर्ण झाल्यावर ई-पावती व माहितीने भरलेल्या अर्जाची उत्पत्ती होईल, त्याची मुद्रित प्रत अर्जदाराने त्याच्या अभिलेखास्तव काढून घ्यावी.

e) सदर व्यवहार यशस्विरित्या पूर्ण न झाल्यास उमेदवार पुनश्च नोंदणी करू शकेल. त्यास विहीत संकेतस्थळास पुन: भेट देवून वरील सुचनांनुसार अर्ज भरता येईल. ह्या व्यवहारात उमेदवाराच्या खात्यातून पैसे वळते झाले असल्यास ते त्याच्या खात्यात पुनश्च ऑन-लाइन जमा होतील.

टिप: ई-पावती व शुल्क जमा केल्याच्या माहितीसह अर्जाचे मागाहूनही पुनर्मुद्रण करण्याची तरतूद उपलब्ध आहे.

8. सदर नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड याचा उपयोग करून उमेदवाराला भरलेल्या अर्जाची प्रत (print out) online प्राप्त करता येईल. सदर अर्ज उमेदवाराने स्वतःजवळ ठेवावा. पोस्टाने किंवा कुरिअरने पाठवू नये. परिक्षेअंती निवड झालेल्या उमेदवारांनी सदर अर्ज, त्यावर स्वतःचा पासपोर्ट आकाराचा अलिकडे काढलेला फोटो चिकटवून अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी, सर्वसाधारण अटी क्र. 6 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह, नियुक्तीपूर्व सादर करणे आवश्यक आहे.

9. परिक्षेचे विहीत शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने ताबडतोब ऑन-लाइन अर्ज सादर करावा. शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने अर्ज केला नाही तर शुल्क परत देण्याबाबतची उमेदवाराची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही.

10. इतर कोणत्याही पद्धतीने उदाहरणार्थ पोस्टाने /कुरिअरने पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.

11. अर्जानुसार पात्र असलेल्या उमेदवारांना परिक्षेसाठी प्रवेश पत्र पोस्टाने किंवा कुरिअरने पाठविण्यात येणार नाही. उमेदवाराने नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड वापरून प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे आणि त्याची प्रत (print out) काढावी.

12. उमेदवाराने प्रवेश पत्रावर स्वतःचे अलिकडे काढलेले रंगीत छायाचित्र चिकटविणे आणि परिक्षेच्या वेळेस ते सादर करणे आवश्यक आहे.

13. ऑन-लाइन परीक्षा बृहन्मुंबईमध्ये/ठाणे जिल्ह्यात घेण्यात येईल. तथापी आवश्यकतेप्रमाणे परीक्षा स्थळांमध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहतील.

14. उमेदवारांना परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

15. परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

**X) सर्वसाधारण अटी -**

1) जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येएवढी निवड यादी बनविण्यात येईल. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळेस पूर्व-सुचना न देता रद्द करण्याचे अथवा वाढविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. यास्तव उमेदवाराचे नाव निवड यादीत समाविष्ट झाले तरीही सदर पदावर त्याचा, नियुक्तीसाठी कोणताही अधिकार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

2) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष यात बदल होऊ शकतो. यास्तव प्रत्येक पदाच्या बदल झालेल्या रिक्त पदानुसार गुणवत्ता यादीतून उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहातील.

3) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला भरतीकरिता यावयाचे असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खाते प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र ऑन-लाइन अर्ज सादर करण्यापूर्वी अथवा प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

4) उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन-कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.

5) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

6) उमेदवांराने नियुक्तीपूर्वी खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्र/कागदपत्र यांच्या मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकित प्रती तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

a) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मदाखला/अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),

b) माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एच.एस.सी.) यांच्या गुणपत्रिका व उत्तीर्णतेची प्रमाणपत्रे, गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे,

c) पदवी/पदविका परीक्षेच्या सर्व सत्र/वर्षांच्या गुणपत्रिका, उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे. तथापि पदवी/पदविका परीक्षेची मूळ गुणपत्रिका पुढील अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अथवा महाविद्यालय यांच्याकडे सुपुर्द केली असल्यास त्याबाबतचे संबंधित विद्यापीठ/महाविद्यालय यांच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व त्यांनीच सांक्षाकित केलेली पदवी/पदविका परीक्षेची छांयाकित गुणपत्रिका आणणे आवश्यक आहे,

d) एस. एस .सी., एच. एस. सी. व पदवी/पदविका किंवा तत्सम परिक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नांत उत्तीर्ण झालेले असल्यास प्रत्येक प्रयत्नांची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे,

e) सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम (latest) प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे. तथापी मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांकडे नियुक्तीच्या वेळी जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध

नसल्यास मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेला संबधित उमेदवार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकेल. मागासवर्गीयासाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्ती झाली असल्यास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या आधीन राहून त्यास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. तथापी, नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत उमेदवारांने संबधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करून त्याबाबतची पोहोचपावती नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक आहे,

f) उमेदवार सरकारी, निम-सरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास नियोक्त्याचे (Employer) ना-हरकत प्रमाणपत्र,

g) विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र/नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करणे आवश्यक आहे,

h) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (Employment exchange card),

i) अ.जा. आणि अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता इतर सर्व प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणारे स्त्री उमेदवार व खेळाडुंसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणारे खुल्या प्रवर्गातील स्त्री/पुरुष उमेदवार यांच्याबाबतीत ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम (latest) प्रमाणपत्र,

j) अपंग उमेदवाराच्याबाबतीत किमान 40 टक्के अपंगत्व असल्याबाबतचे शासनाने निर्देशिल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र.

7. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवारांविरुद्ध पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

8. निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी उमेदवाराला सदर पदाच्या एक महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल किंवा तशा आशयाचे बंधपत्र (Bond) सादर करावे लागेल.

9. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार पाळ्यांमध्येही (Shift duties) काम करावे लागेल.

10. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याला सेवेतून कमी करण्यात येईल.

11. उमेदवाराने परिक्षा हॉलमध्ये गैरवर्तणूक केली किंवा प्रश्नपत्रिका किंवा त्याचा भाग स्वतःकडे ठेवला तर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

12. निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्त्वावर नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, 1999 लागू होतील. तसेच शासन निर्णय क्र. अंनियो/1005/126/सेवा-4 दि. 31.10.2005 अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल.

13. सदर भरती-अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (नैमित्तिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा/अनुपस्थितीचा कालावधी वगळून) असेल व तीन वर्षांनंतरचे सेवा-सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

14. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

15. निवड झालेल्या उमेदवारांविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य-प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची/तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

16. शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या अपंग उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे अपंगत्वाच्या टक्केवारीची प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी पाठविले जाईल व बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर अपंग उमेदवार सदर पदाचे कर्तव्य बजावण्यास अपंगत्वाच्या दृष्टीकोनातून शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्यानंरतच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

**XI) विशेष सूचना -**

1) यापूर्वी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2) सेवायोजन कार्यालय प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनीदेखील या जाहिरातीनुसार online अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

3) जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

4) मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राह्ण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

5) यापूर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरून पुन्हाअर्ज करणे आवश्यक आहे.

6) सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवाराने वेबसाइट उघडण्यासाठी Internet Explorer 6 अथवा त्या वरील आवृत्तीचाच वापर करावा.

7) उमेदवारास अर्ज करावयाचा असल्यास पुढील लिंकवर क्लिक करावे.

http://ibpsreg.sifyitest.com/mcgmdec12/

**सही/-**
**नगर अभियंता**

**सही/-**
**उप.आयुक्त (सा.प्र.)**

**सही/-**
**अति. आयुक्त (पश्चिम उपनगरे)**

Annexure I

## GUIDELINES FOR SCANNING THE PHOTOGRAPH AND SIGNATURE

Before applying online a candidate will be required to have a scanned (digital) image of his /her photograph and signature as per the specifications given below.

(i) **PHOTOGRAPH IMAGE :**

- Photograph must be a recent passport style colour picture,
- The picture should be in colour, against a light-coloured, preferably white, background,
- Look straight at the camera with a relaxed face,
- If the picture is taken on a sunny day, have the sun behind you, or place yourself in the shade so that you are not squinting and there are no harsh shadows,
- If you have to use flash, ensure there is no "red-eye",
- If you wear glasses make sure that there are no reflections and your eyes can be clearly seen,
- Caps, hats and dark glasses are not acceptable. Religious headwear is allowed but it must not cover your face,
- Dimensions 200 X 230 pixel (preferred),
- Size of the file should be between 20kB-50kB,
- Ensure that the size of the scanned image is not more than 50kB. If the size of the file is more than 50kB, then adjust the settings of the scanner such as the DPI resolution, no. of colours etc., during the process of scanning.

**(ii) SIGNATURE IMAGE:**

- The applicant has to sign on white paper with Black Ink Pen,
- The signature must be signed only by the applicant and not by any other person,
- The signature will be used to put on the Hall Ticket and wherever necessary,
- If the Applicant's signature on the answer script, at the time of the examination, does not match the signature on the Hall Ticket, the applicant will be disqualified,
- Dimensions 140 X 60 pixel (preferred),
- Size of file should be between 10kB-20kB,
- Ensure that the size of the scanned image is not more than 20kB.

**SCANNING THE PHOTOGRAPH & SIGNATURE:**

- Set the scanner resolution to a minimum of 200 dpi (dots per inch)
- Set Color to True Color
- File Size as specified above
- Crop the image in the scanner to the edge of the photograph/signature, then use the upload editor to crop the image to the final size (as specified above).
- The image file should be JPG or JPEG format. An example file name is: image01.jpg or image01.jpeg Image dimensions can be checked by listing the folder files or moving the mouse over the file image icon.

Candidates using MS Windows/MSOffice can easily obtain photo and signature in .jpeg format not exceeding 50kB & 20kB respectively by using MS Paint or MSOffice Picture Manager.

Scanned photograph and signature in any format can be saved in .jpg format by using 'Save As' option in the File menu and size can be reduced below 50kB (photograph) & 20kB (signature) by using crop and then resize option (Please see point (i) & (ii) above for the pixel size) in the 'Image' menu. Similar options are available in other photo editor also.

**If the file size and format are not as prescribed, an error message will be displayed.**

While filling in the Online Application Form the candidate should fill in all his details on page 1. After verifying that the details he has filled in are correct and clicking on the 'Submit/Next' button a link will be provided on Page 2 of the online application form to upload his photograph and signature.

**Procedure for Uploading the Photograph and Signature**

I There will be two separate links for uploading Photograph and Signature

II Click on the respective link "Upload Photograph / Signature"

III Browse & Select the location where the Scanned Photo / Signature file has been saved.

